MHND100015712025

## **(निशाणी १ वरील आदेश )**

(दिनांक २३ माहे मार्च, सन २०२६ रोजी पारीत)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम viii नियम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदाराचे पती व गैरअर्जदाराचा मुलगा मारोती पि. बाबुराव अंजिलवाड हे दिनांक ३०.०६.२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत मारोती पि. बाबुराव अंजिलवाड हे एम.एस.ई.बी.डी.सी.एल. मुक्रामाबाद, ता.मुखेड, जि.नांदेड येथे हेल्पर टेक्नीशियन म्हणून नोकरीस होते. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयत मारोती पि. बाबुराव अंजिलवाड यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदाराला विविध शासकीय व निमशासकीय कामाकरीता व नोकरीकरीता अनुकंपा तत्वाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्याने अर्जदाराने सदरचा अर्ज मे. कोर्टात सादर केलेला आहे.

३. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम २ नुसार वारस प्रमाणपत्र देतांना अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. सदर बॉम्बे रेग्युलेशन ऐक्टचे वाचन केल्यानंतर मी निष्कर्षास आलो आहे की, सदर नियमाअंतर्गत वारस प्रमाणपत्र देणे म्हणजे वारस, इच्छापत्र व व्यवस्थापक इत्यादींना औपचारिक मान्यता देणे होय.

४. अर्जदाराने तिच्या कथनाचे समर्थनार्थ मयत मारोती पि. बाबुराव अंजिलवाड यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत (निशाणी १७), मयत मारोतीचे आधारकार्डची पडताळणी प्रत (निशाणी १८), अर्जदाराचे आधारकार्डची पडताळणी प्रत (निशाणी १९), गैरअर्जदाराचे आधारकार्डची पडताळणी प्रत (निशाणी २०) व दि.०९.१२.२०२५ रोजीचे 'श्रमिक एकजूट' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहीर

नोटीसची मुळ प्रत (निशाणी २१) इत्यादी अभिलेखावर दाखल केलेले आहे.

५. अर्जदार दिपाली भ्र. मारोती अंजीलवाड हिने तिचे पुरावा शपथपत्र (निशाणी १६) अभिलेखावर दाखल केले असून तिचा पुरावा अबाधित आहे. सदर प्रकरणामध्ये 'श्रमिक एकजूट' या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा-या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन (निशाणी २१) प्रकाशित करण्यात आले आणि पर्याप्त काळासाठी आक्षेपांची वाट पाहिली परंतु कोणताही आक्षेप आला नाही. सबब अर्जदार व गैरअर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार दिपाली भ्र. मारोती अंजिलवाड व गैरअर्जदार पंचफुलाबाई भ्र. बाबुराव अंजिलवाड ह्या मयत मारोती पि. बाबुराव अंजिलवाड यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदाराने आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.03.23 16:22:10 +0530

(के. एस. खंडारे)
सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर), कंधार

दि.२३.०३.२०२६